# 'एआय'च्या सामर्थ्याने सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये क्रांती: प्रा. जोहरे

## राज्यस्तरीय प्राध्यापक कार्यशाळेत प्रा. किरणकुमार जोहरे यांचे स्फूर्तिदायक व्याख्यान

**पिंपळगाव बसवंत ।** सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापराने व जादूई सामर्थ्याने क्रांतीकारक बदल घडत आहेत. एआयमुळे बांधकामाची कार्यक्षमता, अचूकता आणि सुरक्षा वाढते, तसेच वेळ आणि खर्चात बचत होते. डेटा गोपनीयता आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता यांसारखी आव्हाने असली, तरी आयओटी आणि बिग डेटासह एआय स्वायत्त बांधकाम साइट्स साकारू शकते. एआय आणि ब्लॉकचेनच्या एकत्रीकरणाने स्मार्ट सिटी अधिक कार्यक्षम आणि शाश्वत होतील असे प्रतिपादन मविप्रच्या कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स व कॉम्प्युटर सायन्स विभागात कार्यरत एआय तज्ज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी व्यक्त केले.



चांदवड येथील एस.एन. जे.बी. श्री हिरालाल हस्तीमल (जैन ब्रदर्स, जळगाव) पॉलिटेक्निकच्या सिव्हिल इंजिनीअरिंग विभागातर्फे "सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये एआयचा प्रभावी वापर" या विषयावर राज्यस्तरीय प्राध्यापक प्रबोधन कार्यशाळा (एफडीपी) झाली. यात १०५ प्राध्यापकांना एआयच्या व्यावहारिक अनुप्रयोगांवर प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन प्रा. किरणकुमार जोहरे यांनी केले. प्रा. किरणकुमार जोहरे यांनी सादर केलेल्या केस स्टडीजमधून एआयची प्रभावी क्षमता दिसून आली. पूल आणि इमारतींच्या प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्सद्वारे एआय संभाव्य धोके टाळून इन्फ्रास्ट्रक्चरचे आयुष्य वाढवते. उदाहरणार्थ, लायडर आणि एआयच्या एकत्रित वापराने पर्यावरणीय प्रभाव ३७ टक्के कमी होऊन १२ टक्के खर्च वाचला; एएलआयसीई टेक्नॉलॉजीजने बांधकामाचा वेळ २० टक्के कमी केला; तर स्वेको कंपनीने स्मार्ट सिटी डिझाइनसाठी एआयचा यशस्वी उपयोग केला. भारतात ॲटोडेस्क बीआयएम ३६० आणि सिव्हिल्स.एआय सारख्या साधनांनी प्रकल्प व्यवस्थापन आणि डिझाइन ऑप्टिमायझेशनमध्ये क्रांती घडवली, ज्यांना प्रा. जोहरे यांनी 'गेम-चेंजर' संबोधले. विभागप्रमुख प्रा. डी. बी. पवार यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. वानखेडे यांनी २०२५ हे एआय तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी समर्पित वर्ष म्हणून साजरे करताना कार्यशाळेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. श्री अरविंदकुमारजी भन्साली, श्री राजेंद्रकुमारजी बंब, श्री आनंदजी चोपडा, कमलेशजी ओस्तवाल, श्री अक्षयजी भांडारी यांनीही यावेळी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. प्रा. सौ. आर. एन. बच्छाव यांनी सुत्रसंचालन केले तर आभार प्रा. सौ. वक्ते यांनी मानले.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिन्नर शाखेत सावळा गोधळ

## व्यवस्थापकांच्या उर्मट वर्तणूकीबाबत ग्राहक संतप्त

**सिन्नर ।** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिन्नर येथील शाखेतील सावळा गोधळ पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सभासद व ठेवीदारांना येथील कर्मचारी व शाखा व्यवस्थापक जयश्री सोनवणे यांच्या कडून नेहमी हेतू पुरस्कर त्रास दिला जातो. येथे ठेवण्यात आलेल्या ठेवींची मुदत संपल्यानंतर सदर ठेव पावती नूतनीकरण करण्याची पद्धत असून देखील, सदर मुदत ठेव पावती ही नूतनीकरण करण्यात येत नाही.

सदर ठेवीची मुदत संपल्यावर ठेवीदारांना ठेव रक्कम परत मिळत नाही, ही बाब खरी असली तरी त्या ठेवीवर व्याज देऊन नूतनिकरण करणे ही या बँकेतील कर्मचा-यांची जबाबदारी आहे. परंतु नेहमी फोनवर बोलणे राहणे, ग्राहकांकडे दुर्लक्ष करणे हे नेहमीचे झाले आहे. सभासदांनी तीन चार चक्करा मारल्याशिवाय काम होत नाही. ठेवीवर मिळणारे अल्प व्याजही मिळत नाही. हेतूपुरस्सर मुदत ठेव पावती मुदत संपल्यानंतर नूतनिकरण करायची नाही. नंतर तिचे व्याज दिले जात नाही. मुदत संपलेल्या तारखेपासून व्याज देणे आवश्यक असते. तसे होत नसून, मनमाणी कारभार चालू आहे. पैसे काढण्यास गेल्यास पैसे मिळत नसून सदर पावती ही वेळेवर नूतनीकरण करून दिली जात नाही. ठेवीदारांना वारंवार चकरा मारण्यास लावणे, नीट न बोलणे, चुकीची माहिती देणे, त्रास देणे असे प्रकार बँकेत सर्रासपणे सुरू आहेत. ठेवीची मुदत दोन किंवा तीन महिने हेतू पुरस्सरपणे नूतनीकरण न करणे, ठेवीदारांना दोन-तीन महिन्याचे व्याज नाकारणे हा प्रकार सर्रासपणे सिन्नर शाखेत सुरू आहे.



अशा पद्धतीने येथील शाखा व्यवस्थापक जयश्री सोनवणे सभासद व ठेवीदारांना विनाकारण त्रास देत आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अथवा त्यांची येथून तातडीने बदली करण्यात यावी, अशी ठेवीदारांकडून मागणी होत आहे.

# ॲनिमियामुक्त गाव नाशिक जिल्ह्यातून पिंपळगाव डुकरा ग्रामपंचायतीची निवड

**बेलगाव कुऱ्हे ।** गाव ॲनिमियामुक्त करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातून इगतपुरी तालुक्यातील पिंपळगाव डुकरा या ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली आहे. या अभियानाची सुरुवात नुकतीच करण्यात आली आहे. यानिमित्ताने संपूर्ण वर्षभर आरोग्याबाबत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावेळी सहाय्यक ट्रस्ट समन्वयक प्रमोद शिंदे यांनी आरोग्य, पोषण, आहार, परसबागेचे महत्त्व, शरीरामध्ये रक्त कमी होण्याचे दुष्परिणाम, पांढऱ्या पेशी व लाल पेशी याबद्दल माहिती दिली.




ॲनिमियाचे समूळ उच्चाटन करायचे असेल तर सेंद्रिय पोषण परसबागेची निर्मिती आपल्याला करावी लागेल. त्यातील पालेभाज्यांचा आहारात समावेश करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशिक प्रतिष्ठानचे सहाय्यक समन्वयक निलेश पगारे यांच्या संस्थेमार्फत या एक ते दीड वर्षात गावातील महिलांच्या रक्तवाढीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवून रक्तातील ऑक्सिजन वाढीसाठी प्रयत्न होणार आहेत. इगतपुरीचे गटविकास अधिकारी महेश वळवी, ग्रामपंचायत प्रशासक विस्ताराधिकारी साहेबराव देशमुख, ग्राम पंचायत अधिकारी हर्षिता पिळोदेकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या अभियानासाठी इगतपुरी पंचायत समिती स्तरावरून वेळोवेळी योग्य ती मदत दिली जाईल अशी ग्वाही गटविकास अधिकारी महेश वळवी यांनी दिली. या कार्यक्रमासाठी सीआरपी मालन वाकचौरे, महिला बचत गटातील सर्व अध्यक्ष व सचिव, आरोग्य कर्मचारी, आशासेविका, शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, संगणक परिचालक, ग्रामपंचायत कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती हर्षिता पिळोदेकर यांनी केले.

आभार मुख्याध्यापक चंद्रकांत गांगुर्डे यांनी मानले. उमेद तालुका अभियान व्यवस्थापक उज्वल सोनवणे, तालुका व्यवस्थापक दिपाली वाघ, उपकेंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. दीपिका मोरे आदी उपस्थित होते.

# बाळासाहेब सोनवणे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**नाशिक ।** निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटना विभागीय अध्यक्ष तसेच महिरावणी येथील मातोश्री गि.दे.पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श व उपक्रमशील दिव्यांग उपशिक्षक म्हणून बाळासाहेब दादा सोनवणे यांना शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, दिव्यांग आदी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल नाशिक येथील मनु मानसी सेवाभावी संस्था आणि महावीर इंटरनॅशनल या संस्थेतर्फे 'जीवन गौरव पुरस्कार २०२५' जाहीर करण्यात आला आहे. बाळासाहेब सोनवणे हे नाशिक येथील ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक संस्थेत ३० वर्षापासून अध्यापनाचे कार्य करत आहेत. शिक्षकांबरोबरच महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून दिव्यांग कर्मचारी, बेरोजगार यांना शासनातर्फे सोई सवलती मिळवून देत २५ वर्षापासून दिव्यांग व निराधारांच्या समस्या सोडवत पुनर्वसन करण्याचे काम करत आहे. डॉ. कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनतर्फे जिल्हासमन्वयक म्हणून विद्यार्थी बालवैज्ञानिक बरोबरच मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करत आहे.



# पिंपळगाव बसवंत नगरपरिषदेस 'ब' वर्ग दर्जा

**पिंपळगाव बसवंत ।** आठ महिन्यांपूर्वी नव्याने अस्तित्वात आलेल्या पिंपळगाव बसवंत नगरपरिषदेला राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने शासन स्तरावरून २० जून २०२५ रोजी प्रसारित करण्यात आलेल्या आदेशानव्ये ब वर्ग नगरपरिषदेचा दर्जा जाहीर केल्याने या दर्जामुळे पिंपळगावकरांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध होणार असल्याने नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

पिंपळगाव नगरपरिषदेची अंतिम उद्घोषणा १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन स्तरावरून प्रसारित करण्यात आली होती. त्यावेळी 'क' वर्ग दर्जा मिळाला होता. पिंपळगाव ग्रामपालिकेवर पिंपळगावची वाढती लोकसंख्या, शहराचा दिवसेंदिवस वाढता विस्तार, भौगोलिक परिस्थिती विचाराधीन घेता शासनाच्या नगरविकास विभागाने २०जून २०२५ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार पिंपळगाव बसवंत नगरपरिषदेला ब वर्ग दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आल्याने पिंपळगावच्या सर्वांगीण विकासासाठी आता शासन स्तरावरून कोटवधींचा भरघोस निधी उपलब्ध होणार आहे. पिंपळगाव नगरपरिषदेस ब वर्ग दर्जा देण्यात आल्याने नागरिकांनी निफाडचे आमदार दिलीप बनकर यांच्यासह महायुती सरकारचे आभार मानले आहे.




### आता प्रभाग संख्या वाढणार

पिंपळगाव नगरपरिषदेस ब वर्ग दर्जा प्राप्त झाल्याने प्रभागांची संख्या देखील वाढणार आहे. पिंपळगाव शहरात लोक संख्येच्या आधारावर प्रभागाची रचना होणार असून ब वर्ग नगरपरिषदेत १७ ते ३९ पर्यंत सदस्य संख्या असण्याची शक्यता वर्तविण्यात अली आहे.

"'क' वर्ग दर्जा असलेल्या पिंपळगाव नगरपरिषदला शासन स्तरावरून 'ब' वर्ग दर्जा मिळावा यामागणीसाठी पिंपळगाव नगरपरिषदेने शासनास प्रस्ताव सादर केला होता. अखेर शासनाने या प्रस्तावास मान्यता दिली असून पिंपळगाव नगरपरिषदेस 'ब' वर्ग दर्जा देण्यात आला आहे.

**– संदीप चौधरी, मुख्याधिकारी, पिंपळगाव नगरपरिषद**

"पिंपळगाव नगरपरिषदेला 'ब' वर्ग दर्जा मिळावा यासाठी शासनानेकडे पत्रव्यवहार करत पाठपुरावा केला होता. अखेर शासनाने लोकसंख्या आधारावर दर्जा पिंपळगाव नगरपरिषदेला 'ब' वर्ग दर्जा जाहीर केल्याने भरगोस निधीच्या उपलब्धतेमुळे पिंपळगावचा खुंटलेला विकास मोठ्या वेगाने होईल.

**– दिलीप बनकर, आमदार निफाड**

# सीएसआर उपक्रमातून विद्यार्थ्यांना आधुनिक प्रयोगशाळा साहित्याची देणगी : ॲड. ठाकरे

**दिंडोरी ।** सीएसआर उपक्रमातून विद्यार्थ्यांना आधुनिक प्रयोगशाळा साहित्याची देणगी असल्याचे प्रतिपादन मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या माजी विद्यार्थी संघाच्या उपक्रमातून, जिल्ह्यातील विविध कंपन्यांच्या सीएसआर निधीतून शाळांना शैक्षणिक साहित्य वितरण सुरू आहे. त्याच उपक्रमांतर्गत, जनता इंग्लिश स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, दिंडोरी येथे मेगाफाईन कंपनीच्या वतीने विज्ञान प्रयोगशाळेसाठी सुमारे दोन लाख पन्नास हजार रुपयांचे प्रयोगशाळा साहित्य व अभिनव च्या लहान मुलांना ७० हजार रुपयांचे खेळणीचे साहित्य देण्यात आले.




त्या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना सरचिटणीस नितीन ठाकरे बोलत होते. ते पुढे म्हणाले "आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी प्रयोगशीलता व कौशल्यावर भर दिला पाहिजे. विज्ञानाचा उपयोग शेती, उद्योग व जीवनमान सुधारण्यासाठी करायला हवा. नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रात्यक्षिक आधारित शिक्षण आवश्यक आहे." त्यांनी आयडिया बॉक्समधून पुरस्कार प्राप्त वैष्णवीचेही विशेष कौतुक केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे होते. साहित्य प्रदर्शन व उद्घाटन मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व कंपनीच्या डेप्युटी जनरल मॅनेजर दिपाली बायजू यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाला जेष्ठ सभासद दौलत उखर्डे, माजी प्राचार्य सुरेश पाटील, एस.डी.कदम, विठोबा कदम, मंगेश कदम,बाबा मोरे, सिनिअर कॉलेजचे प्राचार्य मेधने, विद्यालयाचे प्राचार्य शरद शेजवळ, उपप्राचार्य यू.डी.भरसट, पर्यवेक्षक रावसाहेब उशीर,यशवंत दाणी सर्व विज्ञान शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आहेरगाव नेत्रावती सोसायटीच्या चेअरमनपदी जागीरदार ; व्हा. चेअरमनपदी साठे

**निफाड ।** आहेरगाव नेत्रावती सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सुरेश भैय्यासाहेब जागीरदार यांची तर तर व्हाईस चेअरमन पदासाठी समाधान साठे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नेत्रावती सहकारी सोसायटीच्या चेअरमन व्हॉइस चेअरमनपदाची निवड निफाड तालुका निबंधक सुनीता लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सुरेश जागीरदार यांच्या नावाची सूचक म्हणुन रावसाहेब गवळी यांनी केली तर अनुमोदक चंद्रकांत गवळी यांनी दिले. तर व्हाईस चेअरमन समाधान साठी यांच्या नावाची सूचना रमेश साठे यांनी आणली तर अनुमोदक सचिन देशमुख यांनी दिले. या निवडी प्रसंगी संचालक चंद्रकांत गवळी, मुकुंद गवळी, रावसाहेब गवळी, छाया चंद्रेश्वर गवळी, रमेश साठे, सचिन देशमुख, राजाराम साठे, जयश्री दिनकर कुयटे, रमेश कुयटे, दिलिप निकम, सचिव गणेश शिंदे, क्लार्क गणेश गवळी कर्मचारी बागुल व सभासद दिनकरराव कुयटे, साहेबराव साठे, पुंडलिकराव साठे,बाबुराव साठे, बाळासाहेब गवळी, रामराव गवळी, मनोहर जागीरदार, गणपतराव वाघ,सुधीर कुयटे, शांताराम देशमुख सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## ➤ महत्त्वाचे

### डॉ. दिगंबर सनान्से यांचा सत्कार

**नाशिक ।** लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष करणारे डॉ. दिगंबर सनान्से यांनी १९७५ च्या




आणिबाणी काळात तीन महिने मिसा अंतर्गत सक्त मंजुरीची शिक्षा धुळे येथील कारागृहात भोगली. २५ जुनला आणिबाणी संघर्ष काळास ५० वर्षे पूर्ण झाली. १९७५ ते १९७७ या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात आणि लोकशाही च्या मुल्यांसाठी संघर्ष केलात म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सन्मान पत्र देऊन राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते व आ. राजुमामा भोळे, जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.

# पिंपळनेरमध्ये मोकाट जनावरांचा त्रास वाढला

## प्रशासन कळवण घटनेची पुनरावृत्ती टाळणार का? ग्रामस्थांचा सवाल । मोकाट जनावरांमुळे वाढली ग्रामस्थांची 'डोकेदुखी'

**पिंपळनेर ।** कळवण शहरात दोन जणांवर मोकाट जनावरांनी केलेल्या हल्ल्यात एकाचा दुर्दैवी मृत्यू तर एक जण गंभीर जखमी असल्याची घटना नुकतीच घडली आहे.अशातच पिंपळनेर शहरात देखील मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्थानिक प्रशासन अशा मोठ्या अपघाताची वाट बघत आहे की काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. भर रस्त्यात ठाण मांडून बसणाऱ्या मोकाट जनावरांमुळे वाहांचालकांसह स्थानिक ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत.पिंपळनेर शहराचा विकास आणि विस्तार झपाट्याने होत असून धुळे जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ अशी ओळख असलेल्या पिंपळनेर शहरात सध्या सामोडे चौफुली,सटाणा रोड, पंचमुखी कॉर्नर,नवीन भाजीपाला मार्केट या वर्दळीच्या भागासह मुख्य रस्त्यालगत मोकाट जनावरे सध्या मोठ्या प्रमाणात







दिसत असून त्याचा वाहनधारकांना त्रास होत आहे.हे सर्व मोकाट जनावरे रस्त्याच्या अगदी मधोमध जमलेले असतात त्यामुळे वाहनचालकांना आपापली वाहने काढतांना मोठी कसरत करावी लागते. अनेकदा वाहनांचे अपघाताच्या घटनाही घडतात. दरम्यान बुधवारी सकाळी सामोडे चौफुली या भागात एका वृद्ध महिलेवर मोकाट जनावराने हल्ला केल्याची घटना समोर आली. सुदैवाने मोठा अनर्थ जागरूक नागरिकांच्या मदतीमुळे टळला असला तरी कळवण घटनेची पुनरावृत्ती पिंपळनेर शहरात होऊ नये व भविष्यात मोठा अनर्थ होऊ नये यासाठी नगरपरिषद प्रशासनाने वेळीच दखल घेऊन मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे. एकाच ठिकाणी १० ते १५ मोकाट जनावरांचा समूह रस्त्यावर किंवा चौकात उभा असतो.सामान्य नागरिक गावात जातांना या जनावरांच्या मारहाणीचा बळी पडू शकतो.म्हणून त्यांच्यासाठी नगरपरिषदेणे ठोस उपाययोजना आखून योग्य नियमावली तयार केली पाहिजे. ग्रामीण भागातून भाजीपाला घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालावर ही मोकाट जनावरे पहाटेच्यावेळी हल्ला करतात. त्यामुळे वयोवृद्ध शेतकरी या झटापटीत जखमी होऊ शकतात. अशीच परिस्थिती ग्राहकांचीसुद्धा आहे ही मोकाट जनावरे परिसरातील नागरिकांनी पाळलेली असून फक्त दूध काढण्यापुरतेच हे मालक त्यांना जवळ करतात. गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील मोकाट जनावरांसाठी असलेल्या कोंडवाड्याची सुविधा बंद आहे.ती पूर्वीप्रमाणे सुरू झाल्यास दंड आकारण्याच्या धाकाने मोकाट जनावरांचे मालक जनावरांची स्वतः काळजी घेतील अशी प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहेत.

## महत्त्वाचे

### शिवसेना उबाठाचे विष्णू पोरजे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**बेलगाव कुऱ्हे ।** उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना नेते तथा शेवगेडांगचे माजी



उपसरपंच तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे माजी चेअरमन विष्णू पाटील पोरजे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे, अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत मुंबई येथे आ.हिरामण खोसकर, प्रदेश सरचिटणीस गोरख बोडके, राष्ट्रवादी काँग्रेस नेते संदीप गुळवे यांच्या नेतृत्वाखाली उबाठा पक्षाला सोडचिठ्ठी देत नुकताच प्रवेश केल्याने तालुक्यातील राजकारणाला वेगळे वळण लागण्याचे चिन्ह दिसत आहे. गेल्या वीस वर्षापासून शेवगेडांग ग्रामपंचायचे नेतृत्व त्यांनी केले आहे. तालुक्यातील बरेच सामाजिक कार्य केलेली आहे. आमदार हिरामण खोसकर यांचे इगतपुरी तालुका त्र्यंबकेश्वर मतदारसंघात झालेली विकास कामे पाहून प्रेरीत झाल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी माजी आमदार जयंत जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष विष्णुपंथ म्हैसधूने, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अरुण पाटील पोरजे, अरुण गायकर, घोटी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक रमेश जाधव, जयराम धांडे, उदय जाधव, तालुकाध्यक्ष पांडुरंग वारुंगसे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष किरण मुसळे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

### स्कूलबसने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**सिडको ।** कामावरून घरी जात असलेल्या दुचाकीस्वारास पाठीमागून भरधाव वेगाने




आलेल्या स्कूलबसने जोरदार धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. ही घटना दि. २२ जून रोजी दुपारी १.३५ वाजेच्या सुमारास अंबड येथील केवल पार्क रोड, महादेव मंदिराजवळ घडली. फिर्यादी चेतन सुरेश पाटील (वय २५, रा. अष्टविनायक नगर, अंबड) यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबड पोलिसांनी अज्ञात स्कूलबस चालकाविरुद्ध भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८ आणि मोटार वाहन कायदा नुसार गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादींचे वडील सुरेश पाटील हे त्यांची बजाज प्लॅटिना (क्र. एमएच १५ व्हीयू ७३२८) ने कामावरून घरी परतत असताना, महादेव मंदिराजवळ पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या 'फोर्स' कंपनीच्या स्कूलबस (क्र. एमएच १५ जेसी ८३४२) ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले असून, उपचारासाठी तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार आंबेकर यांनी घटनास्थळी भेट दिली. अंबड पोलिस अधिक तपास करत आहेत.

### सायबर गुन्हेगारांकडून मोबाईल हॅक; एक लाखाची फसवणूक

**सिडको ।** मोबाईल हॅक करून बँक खात्यातून पैसे परस्पर काढून घेणाऱ्या सायबर गुन्हेगारांनी नाशिकमधील एका नागरिकाची तब्बल



एक लाख रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात कोलकात्यातील तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी प्रकाश विठ्ठल येवले (वय ४९, धंदा –प्रेस ऑपरेटर, रा. आम्रपाली लॉन्स मागे, कामठवाडे, नाशिक) यांनी तक्रार दाखल केली असून, १९ जून ते २० जून २०२५ दरम्यान ही फसवणूक घडल्याचे समोर आले आहे. सायबर गुन्हेगारांनी फिर्यादी यांचा अँड्रॉइड मोबाईल हॅक करून सर्व वैयक्तिक माहिती मिळवली. त्यानंतर एचडीएफसी बँकेच्या सातपूर शाखेतील खात्यावरून त्यांच्या नावावरून तब्बल ४ लाख ९४ हजार ७५६ रुपयांचे खाजगी कर्ज काढले. यापैकी ५०,००० रुपये अदनान हुसेन आणि ५०,००० रुपये अकिब इस्राईल (दोघे रा. कोलकाता) यांच्या स्टेट बँक खात्यांमध्ये परस्पर वळवले गेले. फसवणुकीच्या या प्रकारामुळे आर्थिक नुकसान झाल्याची फिर्याद अंबड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. याप्रकरणी आकाश वर्मा, अदनान हुसेन आणि अकिब इस्राईल (सर्व रा. कोलकाता) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोकशाही, संविधान रक्षणासाठी निर्णायक संघर्षाची गरज : डॉ. कांगो

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या २५ व्या राज्य अधिवेशनात लांडे यांची राज्य सचिवपदी निवड






**नाशिक ।** भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या २५व्या राज्य अधिवेशनाचा समारोप नाशिक येथे उत्साहात पार पडला. या वेळी पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो यांनी देशात वाढणाऱ्या भांडवली प्रवृत्ती आणि लोकशाहीविरोधी धोरणांवर सडकून टीका केली. "लोकशाही व संविधान टिकवण्यासाठी आणि वंचितांचा आवाज बुलंद करण्यासाठी संघर्ष अपरिहार्य झाला आहे," असे ते म्हणाले.

कॉ. कांगो यांनी सांगितले की, भाकपने माहितीचा अधिकार, मनरेगा, वनहक्क, अन्नसुरक्षा, शेतकरी कर्जमाफीसारखे कायदे राबवण्यासाठी निर्णायक भूमिका बजावली. जुने अन्यायकारक कायदे रद्द करून नव्या जमिन अधिग्रहण कायद्यासाठीही संघर्ष केला.यावेळी पक्षाच्या पुढील तीन वर्षांच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा झाली. ॲड. सुभाष लांडे यांची राज्य सचिव, तर कॉ. राजू देसले (नाशिक) व कॉ. श्याम काळे (नागपूर) यांची सहसचिव म्हणून निवड झाली. २१ सदस्यीय राज्य कार्यकारिणी व ७५ सदस्यांची राज्य कौन्सिल घोषित करण्यात आली. अधिवेशनात जनसुरक्षा विधेयकाचा निषेध, नव्या श्रमसंहितेच्या विरोधात ९ जुलै रोजी देशव्यापी संपाचे आवाहन, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी कायदा, पीकविमा संरक्षण, गिरणी कामगारांचे हक्क, व घरकाम करणाऱ्या महिलांचे वेतन यासारख्या ज्वलंत मुद्द्यांवर ठराव संमत झाले. इस्त्रायल-पॅलेस्टाईन संघर्षावर भाकपने ठोस भूमिका घेत इस्त्रायलशी असलेले सर्व करार रद्द करण्याची मागणी केली. महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा विधेयक २०२४ विरोधात ३० जून रोजी विधिमंडळावर मोर्चाचे आवाहन करण्यात आले. अधिवेशन यशस्वी होण्या साठी राजू देसले, प्राजक्ता कापडणे, तल्हा शेख, मनोहर पगारे, सुनीता कुलकर्णी, पद्माकर इंगळे,भास्कर शिंदे, विराज देवांग, भीमा पाटील, साधना गायकवाड, आर. भोंग, रफिक शेख, प्रणव, कैवल्य,कैलास मोरे,सुरेश गायकवाड यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले. अधिवेशनात तरुण आणि महिला प्रतिनिधींचा उल्लेखनीय सहभाग पाहायला मिळाला.

# छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा



**नाशिक ।** फोस्टर कॉलेज येथे डब्ल्यूएमबीएन फाउंडेशन आणि भारत क्रांती मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र उद्योजक मेळावा आणि छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. महाराष्ट्रात उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासोबतच समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या समाजसेवकांना सन्मानित करणे हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता. हा सोहळा महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक पाऊल ठरला आहे.

छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. विलास पांगारकर यांनी आजवर केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत गौरव करण्यात आला. संभाजीनगरचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष द्वारकानाथ पाथ्रीकर, पृथ्वीराज पवार यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला अनेक नामवंत व्यक्तींची उपस्थिती लाभली. हरिश्चंद लघाने पाटील, माजी आमदार किशोर पाटील, सभापती राधाकिसन पठाडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक विजय काकडे पाटील यांनी प्रास्ताविक करून सोहळ्याची भूमिका स्पष्ट केली, तर शिंदखेड राजा येथील लखुजीराव जाधवांचे वंशज राजे शिवाजीराव जाधव यांनी अध्यक्षस्थान भूषवले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि शिवराय प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. बालवक्ती अक्षरा काकडे हिने आपल्या स्फूर्तिदायक भाषणाने उपस्थितांची मने जिंकली. देवगिरी बँकेचे अध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष भाजपा किशोर शितोळे यांच्यासह कृषी अधीक्षक, प्रसिद्ध उद्योजक, राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी गौरव पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्तींना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे अभिनंदन केले. हा मेळावा महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि सेवाभावी प्रगतीसाठी एक अत्यंत महत्त्वाचे आणि ऐतिहासिक पाऊल ठरला, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# दिंडोरीत रंगली गोकुळ झिरवाळांची मिसळ पार्टी

**दिंडोरी ।** दिंडोरी येथे पावसाळी वातावरणात गोकूळ झिरवाळ मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मिसळ पार्टीला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे विविध व्यवसायातील सर्व हितचिंतक या निमित्ताने एकत्र आले व त्यांनी हितगुज केले. सध्याचे वातावरण कोणत्याही निवडणूकीचे नाही. अथवा कोणत्याही राजकीय सत्ता संघर्षाचे नाही. सध्याच्या वातावरणात सर्व पक्षीय मित्र परिवाराचा संवाद घडवून यावा, तसेच विविध विषयांवर विचारविनिमय व्हावा, यासाठी दिंडोरी येथे गोकूळ झिरवाळ मित्र मंडळाच्या वतीने मिसळ पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मित्र पक्षांसह अनेक राजकीय नेते, कार्यकर्ते सहभागी झाले. यात विशेषत: वकील, डॉक्टर, पत्रकार, छोटे व्यवसायिक, व्यापारी, लघु उद्योजक, भाजीपाला विक्रेते, विद्यार्थी आदींसह सर्व क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. या सर्वांनी आप आपसात चर्चा केली. दिंडोरी तालुक्याच्या विकासावर सर्वांनीच आपले मते मांडले. दिंडोरी - पेठ विधानसभा मतदार संघाच्या विकासाचे पुढचे पाऊल या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. दिंडोरी - पेठच्या विकासासाठी काय केले पाहिजे यावर विचारमंथन करण्यात आले. दिंडोरी शहराच्या विस्तारीकरण, ग्रामीण भागातील शाळांचा दर्जा, वैद्यकीय सेवेतील अडचणी त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना शैक्षणिक विविध दाखल्याबाबत येणाऱ्या अडचणी, पाणी, वीज, रस्ता



याविषयांवर चर्चा झाली. त्यात सर्वांनी सहभाग घेतला. युवा नेते गोकूळ झिरवाळ यांनी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची चर्चा करुन यातून कसा मार्ग काढला जाईल, याविषयी सखोल चर्चा घडवून आणली. सध्याच्या पावसाळी वातावरणात तालूक्यात समाधानकारक पाऊस पडत असतांना धरणांच्या पाणी साठ्यातही समाधानकारक वाढ होत आहे. मात्र पाणी वाढत असतांना तालुक्यातील शेतकरी वर्गाने आताच आपले पाणी आरक्षित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे तरच उन्हाळ्यात आपल्याला वेळेवर पाणी उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे दिंडोरी तालुक्यात येणाऱ्या काळात अनेक ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित करुन मोठ्या प्रमाणात ब्लड साठा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विविध केंद्र व राज्य शासनाच्या योजना जनतेपर्यंत कशा पोहचल्या जातील, यासाठी उपाययोजना करण्यात येणार असल्याचे गोकूळ झिरवाळ यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी डॉक्टर असोशिएशन, मेडीकल असोशिएशन पीसीटी सायलर हॉडवेअर, माजी सैनिक संघटना, व्यापारी संघटन, शेतकरी, कामगार, अल्पसंख्याक, युवक, महिला, विद्यार्थी, शैक्षणिक ॲकडमी, ज्येष्ठ नागरिक, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रासह सर्व पक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते मान्यवर उपस्थित होते. गोकुळ झिरवाळांची क्रेज वाढली दिंडोरी तालुक्यात प्रथमच अन्न व औषध प्रशासन व सहाय्य मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांचे पुत्र गोकूळ झिरवाळ यांनी मिसळ पार्टीचे आयोजन करुन सर्व पक्षीय एकतेचा संदेश देवून राजकारण पलीकडे मैत्रीचे संबंध जोपासले पाहिजे. राजकारण राजकारणाच्या वेळेस करावे मात्र मैत्रीत राजकारण येवू नये, अशा प्रकारचा संदेश देवून जवळपास दोन ते अडीच हजार सर्वच क्षेत्रातील मान्यवरांना आंमत्रित करुन नवीन मिसळ पार्टीचा पायंडा पाडून दिला आहे. त्यामुळे तरुणाईमध्ये गोकूळ झिरवाळांची क्रेज वाढल्याचे आयोजित करण्यात आलेल्या मिसळ पार्टीच्या कार्यक्रमातून दिसून आली आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांना मानधनावर नियुक्ती देऊ नये

## संभाजी ब्रिगेडची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक ।** सेवानिवृत्त शिक्षकांना मानधनावर शिक्षण प्रक्रियेत नेमणूक न देता बेरोजगार तरुणांना संधी देन्याय यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे. यासंदर्भात ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्यासह शालेय शिक्षणमंत्र्यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, स्थानिक परिसरात डीएड, बीएड पदवीधर व पदवीधारक सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. बेरोजगार आहेत. शासनाने सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींना यामध्ये सामावून घेत त्यांच्या नेमणुकी करत बेरोजगारांचा प्रश्न सोडविणे जास्त महत्वाचे आहे. पेन्शनधारकांना ही नेमणूक देणे संयुक्तिक ठरत नाही. जिल्हा परिषद शाळा, मनपा शाळा, नगर पालिका शाळा या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक भरती करून ग्रामीण भागातील शिकलेल्या मुलांच्या पिढीचे जाणीवपूर्वक नुकसान करीत आहात का? असा प्रश्न यामुळे निर्माण होतो. अनेक तरुण बेरोजगार होऊन आत्महत्या करत आहेत. शासन प्राथमिक खासगी शाळा, माध्यमिक खासगी शाळा, अनुदानित शाळामधून सेवानिवृत्त शिक्षक यांची



मानधनावर नेमणूक करीत नाही. मग हा दुजाभाव नेमका कशासाठी? फक्त ग्रामीण भागातील सरकारी शाळा मधूनच नेमणूक करण्याचा आदेश का? असे प्रश्न निर्माण होत आहेत. यामुळे ग्रामीण भागात असंतोषाचे वातावरण निर्माण होत आहे. याचा शिक्षणावर परिणाम होत आहे. डी एड, बी एड झालेले सुशिक्षित बेकार तरुण खूप आहेत. त्यांना तसेच बेकार ठेवून, पेन्शनधारक यांना नेमून तरुणांचे खच्चीकरण करण्यासारखे आहे. म्हणून संभाजी ब्रिगेडची मागणी आहे की, कोणत्याही शाळेवर सेवानिवृत्त शिक्षक यांना मानधनावर नेमणूक देऊ नये. सेवानिवृत्ती नंतर शिकवण्याची मानसिकता कमी होते, असे मानसशास्त्र सांगते. मग लहान मुलांना हे लोकं काय देणार ? फक्त मुलांना सांभाळण्याचे काम करतील का? त्यामुळे भविष्यात अशा कोणत्याच नियुक्त्या होणार नाही असा कायदा करावा. सेवानिवृत्त शिक्षकांची इच्छा असेल निवृत्तीनंतर काम करायची तर शासनाने त्यांना जातीय जनगणना, मतदान प्रक्रिया व शाळाबाह्य कामे यामध्ये सक्रिय करून घ्यावे. त्यामुळे शिक्षकावरही या कामांचा बोजा पडणार नाही व चांगले शिक्षण ग्रामीण स्तरावर सुद्धा उपलब्ध होईल असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन सादर करतेवेळी संभाजी ब्रिगेडचे मार्गदर्शक हिरामण वाघ, उपजिल्हाप्रमुख विक्रम गायधणी, उपमहानगरप्रमुख अमोल जाधव व महेंद्र बेहेरे, लकी बावस्कर निखिल साळुंखे, प्रेम भालेराव आदी उपस्थित होते.



## अजय बोरस्ते यांना मातृशोक

**नाशिक ।** शिवसेनेचे (शिंदे गट) उपनेते तथा जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्या मातोश्री श्रीमती रजनी भास्करराव बोरस्ते यांचे गुरुवारी (दि. २६ जून) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दुपारी ४.३० वाजता काढण्यात आली. त्यांचा अंत्यविधी नाशिक अमरधाम, व्दारका येथे करण्यात आला. यावेळी सर्व स्तरातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुले अजय बोरस्ते आणि अमित बोरस्ते तसेच सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# रोटरी क्लब ऑफ नाशिक गोदावरीकडून विज्ञान साहित्य भेट

**नाशिक ।** विज्ञान शिक्षणात गोडी निर्माण व्हावी, प्रयोगशीलता वाढावी, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ नाशिक गोदावरी तर्फे सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय येथे शालेय विज्ञान साहित्याचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाचे शिक्षण हे केवळ अभ्यासापुरते मर्यादित न ठेवता, दैनंदिन जीवनात त्याचा उपयोग आणि गरज यावर प्रकाश टाकत प्रेरणादायी संदेश दिला. रोटरी क्लब गोदावरीच्या अध्यक्षा डॉ. मीनल पलोड यांनी सांगितले की, "विज्ञानाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी क्लबने पुढाकार घेत विज्ञान साहित्य शाळेला




## विज्ञान शिक्षणासाठी लाखमोलाची मदत

भेट म्हणून दिले. हा उपक्रम इतर शाळांमध्येही राबवण्याचा मानस आहे." बालरोग तज्ज्ञ डॉ. संगीता लोढा यांनी बालकांच्या आरोग्यविषयक सवयी, आहार, स्वच्छता आणि आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सहज व सोप्या भाषेत सांगितले. या कार्यक्रमात शिक्षणाधिकारी मधुकर बच्छाव, रोटरी क्लबचे सरचिटणीस पुरुषोत्तम फुलसुंदर, संचालक रमेश शिंदे, तसेच शाळेचे प्राचार्य गजानन घरटे, पर्यवेक्षक निवृत्ती कमोदकर, मुख्याध्यापक सुनील शेवाळे, डॉ. कीर्ती वर्मा, अनुराधा जगताप, गोकूळ माळी आणि शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षण अधिक प्रायोगिक आणि अनुभवाधिष्ठित व्हावे, यासाठी दिले गेलेले हे विज्ञान साहित्य विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासास आणि वैज्ञानिक विचारसरणीला चालना देणारे लाखमोलाचे योगदान ठरणार आहे, असे गौरवोद्गार सर्व मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

# अंबड येथून चोरी गेलेला १० लाखांचा स्क्रॅप माल जप्त; एक आरोपी जेरबंद

**नाशिक ।** अंबड येथील ए.ए. ट्रेडर्स या स्क्रॅप दुकानातून चोरी गेलेल्या ८.८२ लाख रुपये किमतीच्या २० टन २१० किलो स्क्रॅप माल प्रकरणी एक मोठी कारवाई करत गुन्हे शाखा युनिट-२ ने तब्बल १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला असून, या गुन्ह्यातील रेकॉर्डवरील गुन्हेगार आसीफ युसुफ पठाण (वय २९, रा. सुंदरनगर, जि. जालना) याला अटक करण्यात आली आहे.

फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आयशर गाडी (एमएच ०९ सीए १०१३) मध्ये हा स्क्रॅप माल चोरीला गेला होता. अंबड पोलीस ठाण्यात कलम ३१६ (३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा युनिट-२ कडे देण्यात आला. सपोनि हेमंत तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचा शोध घेण्यात आला. तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी जालना जिल्ह्यात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोउनि मुक्तारखान पठाण, सपोउनि गुलाब सोनार, पोहवा अतुल पाटील, वाल्मिक चव्हाण व मनोज परदेशी यांच्या पथकाने जालना येथे सापळा रचला. आरोपी आसीफ पठाण याला किर्ती ट्रान्सपोर्ट पार्किंग, जालना येथे अटक करण्यात आली. चौकशीत त्याने चोरीचा माल विकल्याची कबुली दिली. त्याच्याकडून ५ लाखांची रोख रक्कम व आयशर गाडी असा १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कामगिरी पोलिस आयुक्तालयाच्या मार्गदर्शनाखाली, अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड यांच्या आदेशानुसार व गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने पार पाडली.

यामध्ये सपोनि डॉ. समाधान हिरे, पोउनि मुक्तारखान पठाण, गुलाब सोनार, नंदकुमार नांदुर्डीकर, संजय सानप, प्रकाश बोडके, अतुल पाटील, प्रकाश महाजन व इतर अंमलदार यांचा सहभाग होता.

# जगदगुरु शांतिगिरीजी महाराजांच्या प्रेरणेने ओझरला सोमप्रदोष उत्साहात

**ओझर ।** निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराजांचे उत्तराधिकारी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी मौनगिरीजी महाराज यांनी ओझर येथे निर्माण केलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे सोमप्रदोष निमित्त अभिषेक पूजन, सत्संग, प्रवचन, श्री बाणेश्वर महादेव मुकुट मिरवणूक सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विधी पाठ, सत्संग, महाप्रसाद व महाआरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.







निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज धर्मपीठाचे पिठाधीश्वर अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरिजी मौनगिरीजी महाराज यांच्या संकल्पनेतून ओझर येथे निर्माण करण्यात आलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे त्रयोदशी, चतुर्दशी, शिवरात्र सोमवार, तसेच संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज संजीवन समाधी दिन या एकाच दिवशी आलेल्या अनेक विशेष तिथीदिनी प्रदोष उत्सव मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाला.अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी (मौनगिरीजी) महाराज यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने आयोजित या सोहळ्याचा प्रारंभ पहाटे ब्रह्ममुहूर्तावर करण्यात आला. नित्य नियम विधी, प्राणायाम, ध्यान, भागवत वाचन, महाआरती यावेळी संपन्न झाली. दुपार सत्रात डॉ.अशोक लद्धा, पत्रकार अमर आढाव, ज्ञानेश्वर भालेराव (सर), सुभाषशेठ भडके, दिगंबर मैड, सौ.जयश्रीताई भालेराव, सौ.श्रद्धाताई आढाव, सौ.सुनीताताई भडके, कुमारी सिद्धी मैड, दिव्या मैड यांच्या शुभहस्ते भगवान बाणेश्वर महादेवाचे अभिषेक पूजन संपन्न झाले.यावेळी जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या श्री मूर्तीचे पूजन स्वामी परमेश्वरगिरीजी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाअभिषेक नंतर भगवान बाणेश्वर महादेवाची ढोल ताशाच्या गजरात लक्षवेधी मुकुट मिरवणूक उत्साहात संपन्न झाली. मिरवणुकीत ३६ ब्रह्मवृंद तसेच भजनी मंडळ उपस्थित होते.यावेळी आश्रमीय संत स्वामी परमेश्वरानंद महाराज यांनी सदगुरु महिमा व प्रदोषव्रत महत्त्व तसेच जनशांती धाम येथे स्थापन केलेल्या देवी देवतांची माहिती उपस्थितांना दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हृदयानंद माऊली, राहुल शिंदे यांनी केले. संत, अतिथी व ब्राम्हण पूजन यावेळी संपन्न झाले. व्यासपीठावर देवानंदगिरी महाराज, ऋषिकेशागिरी महाराज, ऋग्वेदानंद महाराज, दयानंद महाराज, ऋषभदेवानंद महाराज, वेद गुरुकुलमचे संचालक वेदशास्त्र संपन्न पंडित धनंजय जोशी, पंडित महेश गुरु शिवपुरी, भालचंद्र कासार, मधुकरराव शिंदे, सुभाष शेजवळ, रवींद्र चौधरी, हरिश्चंद्र पवार, सुनील मोरे, मधुकर नवघीरे, अण्णासाहेब भडके, पुंडलिक शिवले, माधवराव चौरे, पांडुरंग जाधव, गणेश चौधरी, हेमंत मोहाडकर, ज्ञानेश्वर शेजवळ, संदीप चौधरी, भारत नवघिरे, अरुण चौधरी, रामेश्वर शिवले, गणपत गोडे, भगवान शिलेदार, दौलतराव गायकवाड, सीताराम बिडवे, प्रभाकर निकुंभ, ओंकार गोसावी, व्यवस्थापक संतोष अनवट, के.टी.काशीद, शालिग्राम आढाव, रवींद्र भोई, ज्ञानेश्वर आढाव, सचिन आढाव, अच्युत आढाव, शिवानंद आढाव, अथर्व आढाव, कृष्णा आढाव, शिव आढाव, संजय भालेराव, निखिल भालेराव, प्रदीप धोंडगे, संतोष देवरे, आदित्य देवरे, श्रीपाद मैड, प्रसिद्ध गायक राहुल शिंदे, संकेत भोसले, आकाश दळवी, दीपक गडकरी, योगेश सोनजे यांसह ओझर परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, भाविक तसेच आश्रम सल्लागार समिती, आश्रम नियोजन समिती सदस्य व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सत्संग, महाप्रसाद व महाआरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.यावेळी जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी निर्माण केलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे देव दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली.

# कामगारांचे थकीत वेतनासह वसाका सुरू करण्याची मागणी

## बँकेच्या नाशिक कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलनाचा इशारा

**देवळा ।** येत्या पंधरा दिवसांत राज्य शिखर बँकेने वसाका चालू करण्या संदर्भात निर्णय घ्यावा अन्यथा बँकेच्या नाशिक कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. या संदर्भात तसीलदारांना निवेदन देण्यात आले.



या मागणीसाठी सुरू असलेले उपोषण कामगारांनी दि. २५ रोजी सायंकाळी मागे घेतले. वसंतदादा सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी दि. २५ रोजी देवळा येथे कारखान्यातील आजी माजी कामगार, महिला व सभासदांनी आमरण उपोषण केले. मागील आठवड्यापूर्वी काही मोजक्या कामगारांनी देवळा येथे शिवस्मारकाजवळील पायऱ्यावर मुंडण करून धरणे आंदोलन केले होते. त्या दिवशी दुर्लक्ष करत लोकप्रतिनिधींनी याकडे पाठ फिरवल्याने संतप्त शेकडो कामगार, महिला व परिसरातील सभासदांनी आपल्या मागण्यांसाठी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले. उपोषणस्थळी देवळा बाजार समितीचे सभापती योगेश आहेर, संचालक भाऊसाहेब पगार, माजी सभापती विलास देवरे, प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेश निंबाळकर, कॉंग्रेसचे कळवण तालुकाध्यक्ष प्रभाकर पाटील, भाई दादाजी पाटील, शेतकरी संघटनेचे बागलाण तालुकाध्यक्ष किरण मोरे, केशव सूर्यवंशी, भास्कर बागुल, माणिक निकम, युनियनचे अध्यक्ष विलास सोनवणे, उपाध्यक्ष दीपक पवार, जगदीश पवार, भाऊसाहेब मोरे आदींनी भेट पाठिंबा दर्शविला होता. वसाकाची पाचशे कोटींची मालमत्ता कर्जाभावी धूळखात पडली असून, सभासद व कामगारांचे थकित वेतन रखडले आहे. गेल्या एकवीस महिन्यांपासून बंद असलेल्या कारखान्यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. हा कारखाना पुन्हा सुरळीत चालू व्हावा १व थकित वेतन मिळावे या मागणीसाठी बुधवारी (दि २५) देवळा येथे शशिकांत पवार, कामगार संघटनेचे माजी, कार्याध्यक्ष कुबेर जाधव, जमिनधारक शेतकरी नानाजी पवार, दोधा पवार, आण्णा गुंजाळ, मुन्ना शिंदे, सुनील आहिरे, संजय देशमुख, संजय जगताप, विनायक जाधव, गणू शिंदे, बापू देशमुख, सुभाष निकम आदी सभासद व कामगार तसेच महिला उपोषणास बसले होते. यावेळी सभापती योगेश आहेर, प्रहारचे गणेश निबांळकर यांनी आपले विचार मांडले. सायंकाळी पाच वाजता सर्व कामगारांनी एकजूट दाखवत शिखर बँकेने येत्या पंधरा दिवसात कारखाना सुरू करण्यासंदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा अन्यथा कामगार बँकेच्या कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा काढतील व याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील, असा पवित्रा घेत तहसीलदार डॉ मिलिंद कुलकर्णी यांना निवेदन सादर करून उपोषण मागे घेण्यात आले. उपोषणस्थळी मोठ्या संख्येने कामगार व सभासद उपस्थित होते.

## ➢ महत्त्वाचे

### नात्याची गुंफण म्हणजे रेशीमझुला : प्रा. जाधव

**नाशिक ।** रोजच्या जीवनात आपण अनेक नातेसंबंध जोपासत असतो. मानवी जीवनातील ही विविध नात्यांची बंधनेच आपल्याला अधिक संपन्न करत असतात. ह्या रेशीम नात्यांची मनोहारी




गुंफण म्हणजे 'रेशीमझुला' आहे, असे प्रतिपादन पिंपळगाव बसवंत येथील साहित्यिक प्रा.नामदेव जाधव यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या अभिनव उपक्रमात ते 'रेशीमझुला' या पुस्तकावर बोलत होते. योगाचार्य अशोक पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा.जाधव पुढे म्हणाले की, मानवी जीवन नात्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. शेतकऱ्याचे जमिनीशी नाते, भक्ताचे विठ्ठलाशी नाते, मुलीचे बापाशी असलेले नाते... अशा विविध नात्यांचा आयाम पूर्ण करण्यासाठी नाती जपावी लागतात. माय, माती आणि निसर्ग या सर्वांशी असलेल्या नात्यातून मानवी भावना जपण्याचा प्रयत्न केला तर मानवी मन परिपूर्ण होते, असे सांगून संग्रहातील विविध कविता सादर केल्या. ज्येष्ठ साहित्यिक वाळू आहेर आणि सुहास टिपरे या यांना ग्रंथभेट देऊन सन्मानीत करण्यात आले. सुरेश पवार यांनी सू त्रसंचालन केले तर संजय आहेर यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (२७) सुप्रसिद्ध कवी भास्कर देशमाने 'आंब्यऱ्या-झुंबऱ्या' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### कसमादे मराठा संस्थेतर्फे रविवारी गुणगौरव

**नाशिक ।** कसमादे मराठा उत्कर्ष संस्थेच्या वतीने २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात समाजातील दहावी, बारावी तसेच यु.पी. एस्. सी., एम्. पी. एस्. सी., जे.ई.ई., पी.एच.डी. या परीक्षांमध्ये उत्तम यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवार दिनांक २९ जून रोजी दुपारी ४.३० वाजता मराठा विद्या प्रसारक समाजाच्या आय्. एम्. आर्. टी. महाविद्यालयात आयोजित केला असल्याची माहिती अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. जी. वाघ, कार्याध्यक्ष प्रा.गुलाबराव भामरे, सचिव डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रमुख अतिथी म्हणून रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू व केंद्रीय विद्यापीठ, लखनऊ चे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कसमादेचे भूषण आ. डॉ. राहुल आहेर राहणार आहेत. समारंभात यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन उपाध्यक्ष डॉ. रमेश खैरनार, हिरामण सोनवणे, पंडितराव वाघ, ॲड.रविंद्र निकम, डॉ. शिवराम हिरे, विनीत पवार, प्रमोद आहेरराव, एन. डी.पवार, संजय अहिरराव, प्रा. दिलीप अहिरे ,चंद्रशेखर सोनवणे, दिपक चव्हाण, प्रा. डॉ. नंदु पवार व सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व समन्वय समिती सदस्यांनी केले आहे.

# गैरवर्तणूक असणाऱ्या 'त्या' वादग्रस्त शिक्षकाची तात्काळ बदली करा

## जालखेड ग्रामस्थांचे गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**दिंडोरी ।** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जालखेड येथील एका शिक्षकाची अनेकदा गैरवर्तणूकीमुळे गावातून शिक्षण विभाग पंचायत समिती दिंडोरी येथे लेखी व तोंडी स्वरूपात तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. मात्र या शिक्षकावर कुठल्याही प्रकारची प्रशासनाने कार्यवाही न केल्यामुळे त्यांच्या वर्तनात सुधारणा न होता त्यांच्या गैरवर्तणूकीचे प्रमाण आणखी वाढले आहे. त्यामुळे 'त्या' वादग्रस्त शिक्षकाची तात्काळ इतरत्र बदली करण्यात यावी असे निवेदन जालखेड येथील ग्रामस्थांनी दिंडोरी पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांना दिले.

निवेदनात म्हटले आहे की, सदर शिक्षक हे गावातील पदाधिकारी तसेच शाळेतील मुख्याध्यापक असलेल्या वरिष्ठांशी कायम अर्वाच्य व उद्धट भाषेत बोलत असतात. दि १९ जून रोजी संबधिताने शाळेच्या मुख्याध्यापकांशी वाद घालून त्यांना शारीरिक इजा होण्याच्या हेतूने अंगावर धावून जाण्याचे कृत्य केले व एकेरी भाषेत बोलून मुख्याध्यापकाला पाहून घेईल असा दम देऊन गुंडगिरीचे प्रदर्शन घडवले. ७वीच्या वर्गाचे अध्यापन करण्यास नकार दिला. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव सांगून कायम शाळेत गैरहजर राहतात व मनमानी पद्धतीने हालचाल रजिस्टर भरून शाळेला दांड्या मारतात.विद्यार्थी अध्यक्ष चषक स्पर्धा तयारी करणे, विज्ञान प्रदर्शन व इतर कार्यक्रमांचे नाव सांगून शाळेत अनधिकृतपणे तीन-तीन दिवस गैरहजर राहतात. संबंधिताचे पद प्राथमिक शिक्षक असताना अनधिकृतपणे आपल्या काही अधिकाऱ्यांशी असलेल्या संबंधांचा गैरवापर करून केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख पद ३ वर्ष मिळविले व शालेय कामकाजासाठी सतत गैरहजर राहिले. स्वतःच्या वर्गाचे अध्यापन न करणे .शाळेच्या बाहेर राहता यावे यासाठी वर्गाच्या तुकड्या पाडून सहकारी शिक्षकावर स्वतःच्या वर्गाची जबाबदारी सोपवणे व स्वतः मात्र दिंडोरी व नाशिक येथे साहेबांनी कामासाठी बोलवले आहे असे सांगून शाळेत दांड्या मारणे .महापुरुषांच्या प्रतिमांचा अवमान करणे, महापुरुषांचे फोटो अडगळीत धुळीत फेकून देणे याबाबत ग्रामस्थांनी पंचायत समिती येथे लेखी तक्रार देऊन देखील कार्यवाही झालेली नाही.विद्यार्थ्यांची सहल बाहेर जिल्ह्यात गेली असता सहलीत नशापाणी करून गोंधळ घालणे, धिंगाणा घालणे, याची तक्रार देखील पंचायत समिती शिक्षण विभागात करून या शिक्षकावर कार्यवाही झालेली नाही . गावातील स्थानिक सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य या लोकप्रतिनिधींचा अवमान करणे, उद्धट बोलणे .वर्गाचे अध्यापन न करणे, विद्यार्थी गुणवत्ता कमी असणे, दिलेला पाठ्यक्रम नियोजित वेळेत पूर्ण न करणे, विद्यार्थी गुणवत्तेत वाढ न करता गुणवत्तेची खोटी आकडेवारी दाखवणे .अशा या शिक्षकावर गंभीर स्वरूपाची तक्रार असल्याने शाळेतील शैक्षणिक वातावरण दूषित झालेले असून या शिक्षकामुळे मुख्याध्यापकांच्या जीविताला धोका निर्माण झालेला आहे. या वादग्रस्त शिक्षकाचे गैरवर्तन सातत्याने या शाळेत अनेक वर्षांपासून सुरू आहे ग्रामसभेवर देखील याबाबत चर्चा झालेली आहे. ग्रामपंचायत मासिक सभा, शालेय व्यवस्थापन समिती सभा व पालकांशी विचारविनिमय करून संबंध गावाने एकत्रित येऊन या शिक्षकाची जालखेड शाळेतून इतरत्र तात्काळ बदली करण्याची मागणी ठरावाद्वारे गटविकास अधिकारी यांना भेटून केलेली आहे.

# कळवणमध्ये मोकाट जनावरांमुळे अपघातांवरून भाजप आक्रमक, कोंडवाडा उभारण्याची मागणी

**कळवण ।** कळवण शहरात मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात आणि त्यामुळे निष्पाप नागरिकांचा बळी जात असल्याच्या गंभीर समस्येवर भाजप पदाधिकाऱ्यांनी आवाज उठविला आहे. भाजपच्या वतीने आज कळवणचे तहसीलदार रोहीदास वारुळे, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी नागेश येवला यांना निवेदन देण्यात आले. शहरात तातडीने कोंडवाडा उभारून मोकाट जनावरांच्या त्रासातून नागरिकांची सुटका करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दोन्ही अधिकाऱ्यांनी यावर उचित कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे.



### भाजपच्या प्रमुख मागण्या

* तात्काळ कोंडवाड्याची उभारणी करावी. * निष्काळजीपणा बद्द्ल प्रशासकीय अधिकारी आणि जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी. * हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले भालचंद्र मालपुरे व जखमी झालेले आबा मोरे यांना त्वरित भरपाई मिळावी. * जनावरांच्या मालकांवर कायदेशीर कारवाई करावी. * जनावरांच्या मालकांना आपल्या जनावरांची योग्य काळजी घेण्याबाबत आणि त्यांना मोकळे न सोडण्याबाबत जनजागृती मोहीम राबवावी.

शहरातील नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, कळवणमध्ये मोकाट जनावरे, विशेषतः गायी आणि म्हशी, मोठ्या प्रमाणात रस्त्यांवर फिरत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. २३ जून रोजी जुना ओतूर रोड, शिवाजीनगर येथे मोकाट जनावरांच्या हल्ल्यात भालचंद्र रघुनाथ मालपुरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, आबा मोरे हे जखमी झाले. यापूर्वीही गणेशनगरमध्ये पावसाळी अंधारात रस्त्यावरील जनावरे न दिसल्याने प्रवासी रिक्षाचा अपघात झाला होता. शहरातील चौक, मुख्य रस्ते आणि आठवड बाजारातही मोकाट जनावरांमुळे अनेक वयोवृद्ध, महिला, वाहनधारकांना गंभीर दुखापती झाल्याच्या घटना घडल्या आहेत. प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे जनतेत तीव्र असंतोष पसरला असून, "याला जबाबदार कोण?" असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. निवेदनावर भाजपचे दिपक खैरनार, सुधाकर पगार, डॉ. अनिल महाजन, विकास देशमुख, गोविंद कोठावदे, नंदकुमार खैरनार, निंबा पगार, अशोक बोरसे, हेमंत रावले, संदीप अमृतकार, आशुतोष आहेर, दिपक वेढणे, चेतन निकम, यांच्यासह कळवण शहरातील अनेक जागरूक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पिंपळगावला पाटील महाविद्यालयाच्या टॉपर्स विद्यार्थ्यांची शाही मिरवणूक!

## हजारो विद्यार्थ्यांसह पालक व नागरिकांनी दिला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपळगाव बसवंत ।** नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित लेट बी. पी. पाटील महाविद्यालयाने यंदा शैक्षणिक क्षेत्रात अभूतपूर्व यश संपादन केले असून, संस्थेच्या विद्यार्थ्यांनी जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी या महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांमध्ये जिल्ह्यातच नव्हे तर राज्य पातळीवर आपली प्रगती अधोरेखित केली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी पिंपळगाव बसवंत शहरात भव्य आणि दिमाखदार शाही मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले.




या गौरव मिरवणुकीत लोकसभेचे खासदार भास्कर भगरे, निफाड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष मंगला जाधव उपाध्यक्ष भास्करराव बनकर, सचीव अविनाश देशमाने,सहसचिव अरुण महाले जेष्ठ संचालक सोमनाथ तात्या मोरे,उद्धवराव निरगुडे रमाकांत जाधव सेवक संचालक रामराव बनकर समीर जाधव जेष्ठ शिक्षक नेते शिवाजी निरगुडे तसेच डबीपी पाटील महाविद्यालयाचे व्यवस्थापक दिनेश अनारसे प्राचार्य भंडारे सर उपप्राचार्य योगेश्वर शिरसाठ सर प्राध्यापिका मीनाक्षी जाधव राकेश शहाणे राकेश पगार अंकित सिसोदिया आणि इतर शिक्षक शिक्षिका कर्मचारी यांच्यासह हजारोंच्या संख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक, पिंपळगावकर नागरिक मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

मिरवणुकीची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रांगणातून करण्यात आली. टॉपर्स विद्यार्थ्यांना पारंपरिक पद्धतीने फेटे बांधून, पुष्पहार घालून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सन्मानार्थ रथ आणि आलिशान खुल्या गाड्यांमधून मिरवणूक काढण्यात आली. गुलाल उधळत, ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर सारा परिसर विद्येच्या गौरवगाथेने दुमदुमून गेला.

शैक्षणिक क्षेत्रात विक्रमी कामगिरी या वर्षीच्या परीक्षांमध्ये महाविद्यालयाने जे ई ई (अॅडव्हान्स) मध्ये 20 विद्यार्थी NIT आणि IIT सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश घेण्यास यशस्वी ठरले आहेत. नीट परीक्षेमध्ये 30 हून अधिक विद्यार्थ्यांनी 400 हून अधिक गुण प्राप्त केले आहेत. विशेष म्हणजे, MHT-CET मध्ये तीन विद्यार्थ्यांनी बायोलॉजी विषयात 100% गुण मिळवून राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. तसेच, जवळपास 45 विद्यार्थ्यांनी 99 पेक्षा जास्त पर्सेंटाइल प्राप्त केले असून, 100 विद्यार्थ्यांनी 95 पेक्षा जास्त पर्सेंटाइल मिळवले आहेत. याशिवाय 50 विद्यार्थ्यांनी 90 टक्क्यांहून अधिक गुण मिळवून महाविद्यालयाच्या गुणवत्तेची पातळी उंचावली आहे.

> “ या मिरवणुकीमुळे केवळ पिंपळगाव बसवंत नव्हे तर संपूर्ण नाशिक जिल्ह्यात एक सकारात्मक संदेश गेला आहे की, कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाने कोणतीही शिखरे गाठता येऊ शकतात. आज हे विद्यार्थी जेईई, नीट आणि सीईटीच्या टॉप लिस्टमध्ये आहेत, उद्या हेच विद्यार्थी देशाच्या विकासात मोलाची भूमिका बजावतील यात शंका नाही.
> **- भास्करराव भगरे, खासदार दिंडोरी लोकसभा**

**गौरवाचा क्षण – प्रेरणादायी वाटचाल**

या विद्यार्थ्यांनी केवळ आपली मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राज्य आणि देशपातळीवरील कठीण परीक्षांमध्ये आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान निर्माण झाले आहे.

**शहरात उत्सवाचे वातावरण**

पिंपळगाव बसवंत शहरात एक वेगळाच उत्सव पाहायला मिळाला. या शाही मिरवणुकीला नागरिकांनी पुष्पवृष्टी करत केली . काही ठिकाणी विद्यार्थ्यांचे स्वागत विशेष फलक लावून करण्यात आले.

**शिक्षक आणि पालकांचा सन्मान**

या यशामध्ये योगदान देणाऱ्या शिक्षकवर्गाचे आणि विद्यार्थ्यांच्या पालकांचेही या मिरवणुकीत विशेष सन्मान करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीची प्रशंसा करताना सांगितले की, “हे यश केवळ मार्कांचे नसून विद्यार्थ्यांच्या ध्येय, आत्मविश्वास आणि चिकाटीचे प्रतिक आहे.”

**शैक्षणिक क्रांतीचा प्रारंभ**

लेट बी. पी. पाटील महाविद्यालयाने केवळ निफाड तालुक्याच नव्हे तर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात शैक्षणिक उत्कर्षाची नवी दिशा दाखवली आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयआयटी, एनआयटी, एमबीबीएस, इंजिनिअरिंग हे स्वप्न साकारता येते याचे जिवंत उदाहरण म्हणजे या महाविद्यालयाचे यशस्वी विद्यार्थी.

